**कृपया प्रसिध्दीसाठी** **26 फेब्रुवारी 2013**

## देशाची निराशा, तर मुंबईकरांची उपेक्षा करणारा रेल्वे अर्थ संकल्प : राम नाईक

**मुंबई, मंगळवार:** ‘‘देशाची घोर निराशा करणारा आणि मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्राची उपेक्षा करणारा हा रेल्वे अर्थ संकल्प आहे. देशभरात एकट्या रायबरेलीतच आणखे एक प्रकल्प मिळाल्याने उत्साह असेल’’, अशी टीका माजी रेल्वे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक यांनी केली आहे.

‘‘छुपी भाडेवाढ करणारा हा रेल्वे अर्थसंकल्प आहे, पादचारी पुलासारख्या प्रकल्पांची राज्य सरकारकडे जबाबदारी ढकलून रेल्वे मंत्र्यांनी प्रगतीचे नव्हे तर प्रतिगामी पाऊल उचलले आहे’’, असे स्पष्ट प्रतिपादन करुन श्री. नाईक म्हणाले, ‘‘मुंबई उपनगरी प्रवासी नव्या प्रकल्पांची आतुरतेने वाट पाहात होते. प्रत्यक्षात नवा प्रकल्प तर नाहीच उलटपक्षी चर्चगेट-डहाणू मार्ग तयार होऊन दोन वर्षे होत आली तरीही थेट चर्चगेट-डहाणू गाडी कधी धावणार याचीही घोषणा न केल्याने मुंबईकरांच्या जखमेवर रेल्वे मंत्र्यांनी मीठ चोळले आहे.’’

मुंबईकरांना रेल्वे मंत्री श्री. पवनकुमार बंसल दुधखुळे समजतात काय असा सवाल करुन श्री. नाईक म्हणाले,‘‘गेल्या वर्षीच्या रेल्वे अर्थ संकल्पात मुंबई - उपनगरी रेल्वेसाठी जाहीर केलेली एकही योजना पूर्ण झालेली नाही. 50 सरकते जिने वर्षभरात होणार होते, प्रत्यक्षात एकही झाला नाही. 75 नव्या गाड्या धावणार होत्या, त्याही सर्व सुरु झाल्या नाहीत. आता यंदाही नव्याने 72 अतिरिक्त फे-यांची वाढ जाहीर झाली असली, तरी प्रत्यक्षात किती वाढतील याबद्दल उपनगरी प्रवासी साशंक आहेत. आपली उपेक्षा केल्याची स्पष्ट भावना मुंबईकरांच्या मनात आहे.’’

**(कार्यालय सचिव)**